• वर्ष : ०३ • अंक : १४१ • पुणे • बुधवार, दि. ०४ फेब्रुवारी २०२६ • मराठी दैनिक • पाने ४ • किंमत : २ रूपये • RNI No.-MAHMAR/2023/89313

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

## १ एप्रिलपासून नवीन आयकर कायदा

केंद्र सरकारने जुना आयकर कायदा १९६१ बदलून नवीन आयकर कायदा २०२५ आणला जाईल. हा १ एप्रिल २०२६ पासून लागू होईल. यात कर दर किंवा स्लॅबमध्ये कोणताही बदल नाही, यातून फक्त कर रिटर्न दाखल करण्याची प्रक्रिया सोपी केली जाईल. पगारदारांना १२.७५ लाखापर्यंतचे उत्पन्न करमुक्त करण्यात आले आहे.

### नवीन प्रणालीत मोठी करसवलत

नवीन कर प्रणाली निवडल्यास, पूर्वीप्रमाणेच ४ लाख रुपयांपर्यंतच्या उत्पन्नावर कर भरावा लागणार नाही. यामध्ये, आयकर कायद्याच्या कलम ८७ अंतर्गत, पगारदार व्यक्ती १२.७५ लाख रुपयांपर्यंतच्या उत्पन्नावर आणि इतर १२ लाख रुपयांपर्यंतच्या उत्पन्नावर कर सवलत मिळवू शकतात. नव्या कायद्यात अघोषित उत्पन्नाची मर्यादा १ कोटी रुपयांपर्यंत ठेवण्याचा प्रस्ताव आहे.

### परदेशात पैसे पाठवण्यावर कमी कर

शिक्षण आणि उपचारासाठी परदेशात पैसे पाठवण्यावर तसेच परदेशी टूर पॅकेजवर आता कमी स्रोतावर कर संकलन (टीसीएस) लागेल. सरकारने ते ५% वरून २% पर्यंत कमी करण्याचा निर्णय घेतला आहे.

### जुन्या प्रणालीतील तरतुदी कायम

जुनी कर प्रणाली निवडल्यास, तुमची २.५ लाख रुपयांपर्यंतची कमाई अजूनही करमुक्त राहील. तथापि, आयकर कायद्याच्या कलम ८७ अंतर्गत तुम्ही ५ लाखांपर्यंतच्या उत्पन्नावर कर वाचवू शकता.



## स्वस्त

- चामड्याच्या वस्तू
- सिंथेटिक पादत्राणे
- लेदर उत्पादने
- वैद्यकीय उपकरणे
- १७ कर्करोग आणि मधुमेहावरील औषधे शुल्कमुक्त
- लिथियम-आयन पेशी
- मोबाइल फोन व बॅटरी
- सोलार ग्लास (सौर पॅनेल काच)
- मिश्र वायू (सीएनजी)
- बॅटरीवरील वाहने
- मायक्रोवेव्ह ओव्हन
- परदेश प्रवास
- क्रीडा साहित्य
- परदेशात पैसे पाठवण्यावर ५% ऐवजी २% कर
- वैयक्तिक वापराच्या आयात वस्तूंवर कस्टम ड्युटी २०% वरून १०%

## महाग

- लक्झरी घड्याळं
- इम्पोर्टेड दारू • शूज
- पीव्हीसी फ्लेक्स शीट
- सिगरेट • विडी
- पान मसाला • गुटखा
- अमोनियम फॉस्फेट/नायट्रो-फॉस्फेटची काही खते
- फिल्मसाठी इम्पोर्टेड कॅमेरा
- मद्य • भंगार • खनिज



## अर्थसंकल्प • आयकर स्लॅब स्थिर, संरक्षण दलासाठी वाढीव तरतूद

# पायाभूत सुविधांवर अधिक भर

### कामगार, शेतकरी, उद्योजकांसाठी योजना

वृत्तसेवा • नवी दिल्ली

ऑपरेशन सिंदूरनंतर रविवारी १ फेब्रुवारी रोजी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी पहिला आणि आपला नववा अर्थसंकल्प सादर केला. कामगार, शेतकरी, उद्योजक यांच्यासाठी अनेक प्रोत्साहन योजना जाहीर करण्यात आल्या आहेत. पायाभूत सुविधांच्या तरतुदीवर अधिक भर देताना संरक्षण दलाची तरतूद मागील दहा वर्षांच्या तुलनेत भरघोस वाढविण्यात आली आहे. येत्या १ एप्रिल २०२६ पासून नवीन आयकर कायदा लागू केला जाणार आहे.

संरक्षण बजेटसाठी ७.८४ लाख कोटी रुपये दिले आहेत, जे मागील वर्षापेक्षा १५% जास्त आहेत. अर्थसंकल्पात आयकरबाबत कोणतीही मोठी घोषणा झालेली नाही.

### ७ हाय स्पीड रेल्वे कॉरिडॉर

- मुंबई ते पुणे
- पुणे ते हैदराबाद
- हैदराबाद ते बंगळुरु
- हैदराबाद ते चेन्नई
- चेन्नई ते बंगळुरु
- दिल्ली ते वाराणसी
- वाराणसी ते सिलिगुडी



### भांडवली खर्चात २२% वाढ

सर्वांत मोठी वाढ भांडवली खर्चामध्ये आहे. २०२६-२७ मध्ये यासाठी २.१९ लाख कोटी रुपये देण्यात आले आहेत, जे मागील वर्षापेक्षा २१.८४% जास्त आहे. याचा वापर पायाभूत सुविधा, मालमत्ता, यंत्रसामग्री इत्यादींवर केला जाईल. मागील वर्षी हे १.८० लाख कोटी रुपये होते, ज्यामध्ये सुधारणा करून १.८६ लाख कोटी रुपये करण्यात आले आहे.

### महसुली खर्च १७% वाढवला

महसुली खर्चासाठी या वर्षी ३.६५ लाख कोटी रुपये देण्यात आले आहेत, जे मागील वर्षाच्या तुलनेत १७.२४% जास्त आहे. याचा वापर दारुगोळा, इंधन, दुरुस्ती आणि कर्मचाऱ्यांच्या पगारासारख्या खर्चासाठी केला जाईल.

- अपघात विमा करमुक्त असेल
- २० नवे जलमार्ग बनवणार
- पाच युनिव्हर्सिटी टाऊनशिप
- भारताला मेडिकल टुरीझम केंद्र
- प्रत्येक जिल्ह्यांमध्ये वसतिगृह

### पायाभूत सुविधांची मजबुती



*देशात सुधारणांची एक प्रेरणा सुरू झाली आहे. पायाभूत सुविधा मजबूत करण्यासाठी अर्थसंकल्पात अनेक मोठी पावले उचलण्यात आली आहेत. हाय-स्पीड रेल्वे कॉरिडॉर, टियर २ आणि ३ शहरांच्या विकासावर लक्ष केंद्रित करणे, या सर्वांमुळे भारताचा विकसित भारताकडे प्रवास वेगवान होईल. कौशल्य, प्रमाण आणि शाश्वतता बळकट करण्याचा हा प्रयत्न असून हा अर्थसंकल्प सुधारणांना नवीन चालना देईल.*

**- नरेंद्र मोदी**, पंतप्रधान


### सुधारणा एक्सप्रेस वेगाने धावेल



*आम्ही १२ वर्षांपूर्वी आम्ही सत्तेत आलो, त्यावेळी भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये अनेक त्रुटी होत्या. त्यामध्ये आर्थिक स्थैर्य नव्हते, राजकोषीय तूट मोठ्या प्रमाणात होती. विकसित भारतासाठी आम्ही वेगवेगळ्या संकल्पना राबवल्या, भारतीय अर्थव्यवस्था बळकट केली. सरकारच्या या धोरणांना लोकांनीही पाठिंबा दिला. आमचे सरकार आयातीवरची निर्भरता कमी करत आहे. येत्या काळात आमची सुधारणा एक्सप्रेस ही वेगाने धावेल.*

**- निर्मला सीतारमण**, केंद्रीय अर्थमंत्री

### वास्तवाकडे पाठ फिरवणारा अर्थसंकल्प



*तरुणांसाठी रोजगार देणारा हा अर्थसंकल्प नाही. उत्पादन क्षेत्र घसरत आहे. गुंतवणूकदार भांडवल काढून घेत आहेत. देशात तरुणांना रोजगार मिळत नाही, मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्रात घसरण होत आहे, घरगुती बचत कमी होत असून गुंतवणूकदार भांडवल बाहेर काढत आहेत, शेतकरी संकटात असून जागतिक आर्थिक धक्क्यांकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे. अशा परिस्थितीत, हा अर्थसंकल्प समस्या सोडवणारा नसून, वास्तवाकडे पाठ फिरवणारा आहे.*

**- राहुल गांधी**, विरोधी पक्षनेते, लोकसभा

### हायस्पीड कॉरिडॉरमुळे जीडीपीत वाढ



*पंतप्रधान नरेंद्र मोदीयांच्या नेतृत्वाखाली अर्थमंत्री निर्मला सितारामण यांनी मांडलेला अर्थसंकल्प विकसीत भारताच्या स्वप्नाकडे जाणारे दमदार पाऊल आहे. महाराष्ट्रातील मुंबई-पुणे आणि पुणे-हैदराबाद हायस्पीड रेल्वे कॉरिडॉरमुळे जीडीपीत मोठी वाढ होईल. प्रत्येक ग्रोथ हबसाठी ५००० कोटी प्रत्येकी ५ वर्षांत प्राप्त होणार आहेत, त्याचा लाभ मुंबई महानगर (एमएमआर), पुणे महानगर, नागपूर महानगर ग्रोथहबसाठी होणार आहे.*

**- देवेंद्र फडणवीस**, मुख्यमंत्री

### विस्कळीत अर्थसंकल्प



*हा अत्यंत विस्कळीत अर्थसंकल्प आहे. तीन कॉरिडॉरबद्दल त्यांनी (अर्थमंत्र्यांनी) जे सांगितले ते निव्वळ खोटे आहे. हे प्रकल्प आधीपासूनच सुरू आहेत. आम्ही यावर काम सुरू केले आहे. पुरुलियामध्ये जंगलमहल जंगल सुंदरी प्रकल्पासाठी, या आर्थिक कॉरिडॉरमध्ये ७२,००० कोटी रुपयांची गुंतवणूक केली जाईल. त्यांनी बंगालला एक पैसाही दिलेला नाही.*

**- ममता बॅनर्जी**, मुख्यमंत्री, पं. बंगाल

# महापौरपदी मंजूषा नागपुरे

## अजितदादांनी दिलेला शब्द राष्ट्रवादीनं पाळला

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महापालिकेच्या महापौरपदासाठी भाजपच्या नगरसेविका मंजूषा नागपुरे यांचे नाव निश्चित झाल्याची माहिती समोर येत आहे. महापौर पदाची निवडणूक बिनविरोध होणार असल्याने निवडणूक औपचारिकता राहिली आहे. सिंहगड रोडला प्रथमच महापौर पदाचा मान मिळाला आहे. नागपुरे सलग तिसऱ्यांदा नगरसेवक झाल्या, यंदाच्या निवडणुकीतही त्या बिनविरोध निवडून आल्या आहेत.

पुणे महापालिकेची निवडणूक मैत्रीपूर्ण लढली गेली. देवेंद्र फडणवीस-अजित पवार यांच्यात झालेल्या चर्चेनुसार महापौर-उपमहापौर पदाची निवडणूक बिनविरोध होईल ठरले होते. त्यामुळे या निवडणुकीत उमेदवार दिला जाणार नाही, अशी माहिती राष्ट्रवादीच्या नेत्यांनी दिली.

मंजूषा नागपुरे या कडव्या हिंदुत्ववादी विचारसरणी, भाजपच्या निष्ठावंत नगरसेविका म्हणून ओळखल्या जातात. महापालिकेच्या कामाच त्यांचा चांगला अनुभव आहे. स्थायी समितीसारख्या महत्त्वाच्या समितीवर त्यांनी काम केले आहे. महापौरपदासाठी रंजना टिळेकर, वर्षा तापकीर आणि मानसी देशपांडे यांच्या नावांची चर्चा होती.



योगेश टिळेकर यांना आमदारकी दिल्याने त्यांच्या मातोश्री रंजना टिळेकर यांचा पत्ता कट करण्यात आला. तर मानसी देशपांडे या आमदार, राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या भावजयी आहेत. त्यामुळे त्यांना पद देण्यात आले नसल्याची माहिती आहे.

- **पुणे महापालिकेच्या निवडणुकीत भाजपचे ११९ नगरसेवक निवडून आले आहेत, येथे भाजपची एकहाती सत्ता आली आहे.**
- **पुण्याचे महापौरपद सर्वसाधारण गटातील महिलेसाठी राखीव झाले आहे.**
- **महापालिका निवडणुकीत भाजपने मोठ्या प्रमाणात महिलांना उमेदवारी दिली होती.**
- **११९ महिलांना संधी दिली होती. त्यापैकी ५० पेक्षा अधिक महिला नगरसेविका म्हणून निवडून आल्या आहेत.**

### पुण्यात कोणत्या पक्षाला किती जागा मिळाल्या?

**भाजप : ११९ राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) : २७ काँग्रेस : १५ राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) : ३ शिवसेना (UBT) : ०१**

## तुरुंगात असलेल्या तीन आरोपींना कोर्टाकडून दिलासा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पोर्शे कार अपघातप्रकरणात तीन आरोपींना सर्वोच्च न्यायालयाकडून जामीन मंजूर करण्यात आला आहे. पुण्यातील कल्याणीनगर परिसरात घडलेल्या या गाजलेल्या प्रकरणात अल्पवयीन मुलांच्या गैरवर्तनासाठी त्यांच्या पालकांची जबाबदारी निश्चित असल्याचे स्पष्ट शब्दांत सांगत न्यायालयाने पालकांच्या भूमिकेवर कठोर टीका केली आहे. केवळ मौजमजा आणि चैनसाठी अल्पवयीन मुलांच्या हाती महागड्या गाड्यांच्या चाव्या आणि अमर्याद पैसा देणे अजिबात स्वीकारार्ह नाही, असे मत न्यायालयाने व्यक्त केले. या प्रकरणात अपघातानंतर पुरावे नष्ट करण्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आलेल्या तीन आरोपींना जामीन देण्यात आला आहे. अल्पवयीन पोर्शे कार चालक आणि त्याच्या दोन मित्रांच्या रक्तनमुने बदलल्याचा आरोप या तिघांवर आहे. न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्ना आणि न्यायमूर्ती उज्जल भुयान यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला. अमर सतीश गायकवाड, आदित्य अविनाश सूद आणि आशिष सतीश मित्तल अशी जामीन मंजूर झालेल्या आरोपींची नावे आहेत. या प्रकरणात एकूण दहा



जणांविरोधात भारतीय दंड संहिता, मोटार वाहन कायदा तसेच भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यामध्ये अल्पवयीन मुलाचे पालक, काही डॉक्टर, रुग्णालयातील कर्मचारी आणि इतर मध्यस्थांचा समावेश आहे. यापूर्वी मुंबई उच्च न्यायालयाने डिसेंबर २०२५ मध्ये नऊ आरोपींचे जामीन अर्ज फेटाळले होते. त्यानंतर संबंधित आरोपींनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. १८ मे २०२४ रोजी मध्यरात्री कल्याणीनगर येथे भरधाव वेगात पोर्शे कार चालवणाऱ्या अल्पवयीन मुलाने दुचाकीला धडक दिली होती. या भीषण अपघातात तरुण-तरुणीचा जागीच मृत्यू झाला. अपघातापूर्वी हा मुलगा आणि त्याचे दोन मित्र मुंढवा येथील पबमध्ये मद्यप्राशन करून बाहेर पडल्याचे तपासात उघड झाले. त्यानंतर सर्वांना ससून रुग्णालयात नेण्यात आले होते.




जाहिरात म्हणलं की
दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा

आपल्या सर्व कायदेशीर आणि अधिकृत जाहिरातींसाठी विश्वासार्ह व्यासपीठ

आम्ही प्रकाशित करतो :
- वकील नोटीस
- कोर्ट नोटीस
- जाहिर नोटीस
- वाहन हस्तांतरण नोटीस
- बँकांचा ताळेबंद
- सर्वांना आवाहन करणाऱ्या जाहिराती
- ग्रामपंचायत जाहिराती

दै. आरंभ पर्व हे आपल्या जाहिराती योग्य वेळी व नियमांनुसार प्रसिद्ध करून देण्यासाठी वचनबद्ध आहे.

- विश्वासार्हता
- वेळेवर प्रकाशन
- कायदेशीर आवश्यकता पूर्ण

संपर्क : प्रतिक गंगणे ७२७६३१४१४२ / ८६५७८६५७०२





# भाजपा–आरपीआय आघाडीची सारोळ्यात भव्य प्रचार पदयात्रा

## सर्वांच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असल्याची ग्वाही

**बार्शी (दै. आरंभ पर्व)**

सोलापूर जिल्हा परिषद व बार्शी पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक 2026 ची धुमाळी सुरू असताना, बार्शी तालुक्यातील सारोळे येथे राजाभाऊ राऊत यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पक्ष–रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया व मित्रपक्ष आघाडीची भव्य प्रचार पदयात्रा उत्साहात पार पडली.

शेळगाव जिल्हा परिषद गटाच्या उमेदवार सौ. सोनाली महेश बोधले, व शेळगाव पंचायत समिती गणाच्या उमेदवार सौ.सविता विश्वनाथ साबळे यांच्या प्रचारात या पदयात्रेचे आयोजन करण्यात आले .

एकता चौक येथून सुरू झालेली ही पदयात्रा झोपडपट्टी, हटवटी चौक, नरसिंह मंदिर व महादेव मंदिर मार्गे पूर्ण झाली. पदयात्रेत लहान मुले, महिला तसेच सर्व समाजघटकातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

यावेळी माजी आमदार राजाभाऊ राऊत यांच्या नेतृत्वाखाली सारोळे व परिसरातील गावांसाठी उपलब्ध करून दिलेला भरीव निधी, तसेच गावाच्या सर्वांगीण कल्याणासाठी सुरू असलेले विकासात्मक उपक्रम यांचा नागरिकांनी विशेष उल्लेख केला. प्रथमच या गावाला संधी दिल्यामुळे येथून आघाडीच्या उमेदवारांना जास्तीत जास्त मतदान होईल, असा विश्वास उपस्थित ग्रामस्थांनी व्यक्त केला. या पदयात्रेत उमेदवार सौ.सोनाली महेश बोधले, सविता विश्वनाथ साबळे यांच्यासह माजी पंचायत समिती सदस्य विलासदादा गाटे, मा. सरपंच बाळराजे गाटे, सरपंच सुवर्णा सुशांत काकडे, उपसरपंच जितेंद्र चौधरी, आगतराव भोसले, माजी सरपंच शिवलिंग मुंबरे, प्रकाश गाटे , बालाजी निचळ,कल्याण  पाटील,नानासाहेब गाटे, मारुती गाटे,मोहन गाटे,अरुण पाटील, राजेंद्र  गाटे,सतीश गाटे, कल्याण गाटे ,चंद्रकांत साबळे, ग्रामपंचायत सदस्य संदीप साबळे, रेखा साबळे,प्रभावती साबळे , शीला साबळे,शामल साबळे , मैना कांबळे, विजय महापुरे लक्ष्मण ठोंबरे,यांच्यासह  माजी आ . राजाभाऊ राऊत गटाचे कार्यकर्ते व अनेक मान्यवर उपस्थित होते.

पदयात्रेमुळे गावात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, आगामी निवडणुकीत आघाडीला मोठे पाठबळ मिळेल, असा विश्वास कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.

## जागतिक कर्करोग दिवस : मधुमेह व लठ्ठपणामुळे कर्करोगाचा धोका वाढला

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतात विशेष करून तरूण वयात मधुमेह आणि लठ्ठपणाचे वाढते प्रमाण हे चिंताजनक असून यामुळे कर्करोगाची जोखीम देखील वाढत आहे.त्यामुळे मधुमेह व लठ्ठपणाकडे फक्त जीवनशैलीशी निगडीत समस्या म्हणून न बघता गांभीर्याने बघण्याची गरज आहे,असे मत विविध तज्ज्ञांनी व्यक्त केले. 4 फेब्रुवारीला जागतिक कर्करोग दिनानिमित्त लवकर निदान व उपचाराचे महत्त्व याबाबत जागरूकता निर्माण केली जाते. नोबल हॉस्पिटल्स अॅन्ड रिसर्च सेंटर येथील आँकोलॉजी विभागाचे प्रमुख डॉ.मिनिष जैन म्हणाले की,चयापचयमधील असंतुलन आणि दीर्घकालीन दाहक स्थिती कर्करोगाच्या पेशींसाठी अनुकूल वातावरण निर्माण करतात. लठ्ठपणा हा एक प्रमुख जोखीम कारक घटक असून सध्या किमान 13 प्रकारच्या कर्करोगांशी असलेल्या जोखमीशी संबंधित आहे. इन्सुलिन प्रतिरोधक क्षमता सततच्या दाहक स्थितीला आणखी हातभार लावते आणि कर्करोगाची जोखीम आणखी वाढू शकते.

## हवेली जिल्हा परिषद–पंचायत समिती मतदार यादी वर्किंग कॉपीच्या कामास वेग

**हवेली, पुणे (दै. आरंभ पर्व)**

- **अंतिम मतदार यादी तयार करण्याची प्रक्रिया पूर्ण**

हवेली जिल्हा परिषद व पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या गट व गणांच्या मतदार यादी अद्ययावत करण्याच्या प्रक्रियेला वेग आला असून अंतिम मतदार यादी तयार करण्याचे काम यशस्वीरीत्या पूर्ण झाले आहे. हवेली येथील मतदार यादी वर्किंग कॉपी कक्षामध्ये अधिकारी व कर्मचारी अहोरात्र कार्यरत राहून ही प्रक्रिया पार पाडण्यात आली. निवडणूक प्रक्रियेत कोणतीही त्रुटी राहू नये, यासाठी प्रशासनाकडून काटेकोर नियोजन व विशेष दक्षता घेण्यात आली आहे. सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याशी समन्वय साधून अंतिम मतदार यादीची छपाई प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे. मान्यताप्राप्त राजकीय पक्षांचे उमेदवार व प्रतिनिधींना अंतिम मतदार यादी वेळेत उपलब्ध करून देण्यावर प्रशासनाचा विशेष भर राहिला असून, त्यामुळे निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता व विश्वासार्हता अधिक बळकट होणार आहे. मतदार यादीची वर्किंग व मार्क कॉपी तयार करताना आवश्यक माहितीचे सखोल संकलन व पडताळणी करण्यात आली. नोंदणीकृत मतदारांची नावे, पत्ते तसेच इतर तपशीलांची अचूकता तपासण्यात आली असून मृत, स्थलांतरित तसेच दुहेरी नोंदी असलेल्या मतदारांची छाननी करून यादी त्रुटीमुक्त करण्यात आली आहे. भारत निवडणूक आयोगाने वेळोवेळी जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोर पालन करत प्रत्येक टप्प्यावर आवश्यक कार्यवाही करण्यात आली.

निवडणूक प्रक्रियेत कोणताही गोंधळ अथवा त्रुटी निर्माण होऊ नयेत, यासाठी प्रशासनाने प्रत्येक बाबीची बारकाईने तपासणी केली आहे. मतदारांना योग्य व वेळेवर सेवा मिळावी तसेच निवडणूक प्रक्रिया शांततापूर्ण, पारदर्शक आणि सुरळीत पार पडावी, हा प्रशासनाचा मुख्य उद्देश असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. यशवंत माने, तहसीलदार अर्चना निकम व तृप्ती कोलते तसेच नोडल अधिकारी रोहन भोसले, प्रा. सचिन शेळके आणि अविनाश तोरणे यांनी माहिती दिली की, संपूर्ण मतदार यादी प्रक्रिया निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार पारदर्शक व सुव्यवस्थित पद्धतीने राबविण्यात आली असून अंतिम मतदार यादी लवकरच सर्व संबंधितांना उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

# हवेली पश्चिम भागाचा विकासाचा आवाज बुलंद!

- **खेडशिवापूर–खानापूर गटातून पुजा नवनाथ पारगे रिंगणात**
- **‘घड्याळ’ वाजणारच – जनतेचा ठाम निर्धार**

**खेडशिवापूर-विशाल भालेराव (दै. आरंभ पर्व)**

हवेली पश्चिम भागातील जिल्हा परिषद खेडशिवापूर–खानापूर गट निवडणुकीत प्रथमच पश्चिम भागातील स्थानिक, सुशिक्षित व अभ्यासू युवा चेहऱ्याला संधी मिळाल्याने संपूर्ण भागात आनंदाचे आणि आपुलकीचे वातावरण निर्माण झाले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून पुजा नवनाथ पारगे यांना उमेदवारी




मिळाल्याने सर्वसामान्य जनतेत नव्या आशेचा संचार झाला आहे.

गेल्या दहा वर्षांत पश्चिम भागात विकासकामांचा धडाका लावत, सामान्य माणसाच्या हाकेला धावून जाणारे माजी जिल्हा परिषद सदस्य नवनाथ पारगे यांनी प्रभावी नेतृत्व सिद्ध केले आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत स्वतः उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी पक्षाचा विश्वास दाखवला असून, त्याच विश्वासाला बळ देण्यासाठी पुजा नवनाथ पारगे यांना मैदानात उतरवण्यात आले आहे.

त्या संधीचे सोने करण्याचा निर्धार पश्चिम भागातील जनतेने केला असून, जिल्हा परिषद सभापतीपदासाठी सक्षम, अभ्यासू व तरुण नेतृत्व म्हणून पुजा नवनाथ पारगे यांच्याकडे पाहिले जात आहे. प्रस्थापित नेत्यांच्या कुटील राजकारणाला छेद देत, विकासाचा स्पष्ट अजेंडा घेऊन त्या रिंगणात उतरल्या आहेत.

शालेय विद्यार्थ्यांच्या गैरसोयी, आरोग्य सुविधा, शेतीविषयक प्रश्न असोत किंवा प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे रखडलेली कामे असोत—प्रशासनाला जागं करून काम करून घेणारी निस्वार्थ भूमिका पुजा नवनाथ पारगे यांनी सातत्याने बजावली आहे. त्यामुळेच “काम करणारी माणसं” म्हणून त्यांच्यावर जनतेचा ठाम विश्वास आहे. भागाचा शाश्वत व सर्वांगीण विकास साधण्यासाठी पश्चिम भागाचा भूमिपुत्रच नेतृत्व करावा, या भूमिकेतून संपूर्ण गटातील जनता एकवटली आहे. हुकूमशाही व दडपशाहीला आळा घालण्यासाठी यावेळी ‘घड्याळ’ हेच चिन्ह निवडण्याचा निर्धार मतदारांनी केला असून, पश्चिम भागात ‘घड्याळ’ जोरात वाजणार हे निश्चित मानले जात आहे.

## भाजपा उमेदवारांच्या प्रचारार्थ बार्शीत संवाद मेळावा

**बार्शी (दै. आरंभ पर्व)**

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत पराभव अटळ असल्याची जाणीव झाल्याने विरोधकांनी अनैसर्गिक आघाडी केली आहे, अशी टीका पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केली. बार्शी येथे आयोजित भारतीय जनता पक्षाच्या संवाद मेळाव्यात ते बोलत होते. जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजप, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) तसेच समविचारी मित्रपक्षांच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ हा संवाद मेळावा आयोजित करण्यात आला होता. यावेळी माजी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर, माजी आमदार राजेंद्र राऊत, बाजार समिती सभापती विजय गरड, उपसभापती बाबासाहेब गायकवाड, भाऊसाहेब आंधळकर आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. पालकमंत्री गोरे म्हणाले की, भाजपने केलेल्या विकासकामांमुळे जनतेचा पक्षावर विश्वास अधिक दृढ झाला आहे. नुकत्याच झालेल्या नगरपालिका व बाजार समिती निवडणुकांतून हा विश्वास स्पष्ट झाला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली बार्शी तालुक्यासाठी मोठ्या प्रमाणात विकासनिधी उपलब्ध झाला असून, सुमारे ५० हेक्टर जमीन पाण्याखाली जाणार असल्याने शेतकरी व नागरिकांना मोठा लाभ होणार आहे.

## नेटबॉल स्पर्धा खेळाडूंनी वाहिली भावपूर्ण श्रद्धांजली

**नांदेड (दै. आरंभ पर्व)**

पुणे क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या मान्यतेने जिल्हा क्रीडा परिषद, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, महाराष्ट्र नेटबॉल असोसिएशन आणि नांदेड जिल्हा नेटबॉल असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने सन २०२५–२६ या वर्षातील राष्ट्रीयस्तर शालेय नेटबॉल स्पर्धा यशस्वीरीत्या पार पडल्या. या स्पर्धेत महाराष्ट्राच्या तिन्ही वयोगटातील संघांनी दैदिप्यमान कामगिरी करत सुवर्णपदकांची कमाई केली. ही तिन्ही सुवर्णपदके दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली म्हणून समर्पित करण्यात आली.

दि. २७ जानेवारी ते १ फेब्रुवारी या कालावधीत श्री गुरुग्रंथ साहिब भवन मैदान, गुरुद्वारा परिसर येथे स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.



- **महाराष्ट्र संघाने जिंकलेले सुवर्णपदक अजितदादा पवार यांना समर्पित**

देशभरातून आलेल्या शालेय संघांनी खेळातील शिस्त, संघभावना आणि कौशल्याचा उत्कृष्ट प्रत्यय दिला.

### महाराष्ट्र संघाची दमदार कामगिरी

**१४ वर्षे मुले : कार्तिक वाघ, निखिल राजपूत, यश पांडे, राज वाघ, साहिल मुलानी, साई गजभारे, अनमोल जाधव, विरोचन शिंदे, अनिरुद्ध लंगोटे, आयुष येरणे, धनुष झावरे.**

**१४ वर्षे मुली : भावना गावडे, सृष्टी गायकवाड, वेदिका तनपुरे, मोहिनी पडोळे, नंदिनी जगदेवे, अनुष्का गायकवाड, गीता कांबळे, ऋतुजा वाघ, समृद्धी पवार, दुना दापले, रोशनी बनसोडे, रक्षिता बकवाड.**

**१७ वर्षे मुली : अक्षता कोकणे, विशालाक्षी राठी, नेत्रा कांसरा, अनुष्का चामलाटे, पूर्वश्री वाघ, सई इजाते, कविता नाईक, कुशो हलमारे, अचिनी तांबारे, जिज्ञासा चौहाण, जान्हवी आघाव, ईशा पाटील.**



# पत्रकाराची बदनामी केल्याप्रकरणी एकावर पत्रकार संरक्षण कायद्यांतर्गत गुन्हा दाखल

**संगमनेर (दै. आरंभ पर्व)**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या अपघातात निधनानंतर सत्ताधारी शिवसेना शिंदे गटाच्या विकृत माजी शहर प्रमुख दिनेश फटांगरे याने स्व. अजितदादांवर सोशल मीडियावर वादग्रस्त पोस्ट टाकली. आरोपी एव्हढ्यावरच थांबला नाही तर त्याने या घटनेची बातमी दैनिक युवावार्ताने प्रकाशित केल्याचा राग धरून त्याच्या फेसबुक पेजवर संपादक किसन भाऊ हासे यांच्यावर अतिशय खालच्या पातळीवर जाऊन अश्लील पोस्ट केली. त्यामुळे वर्तमानपत्र व संपादकांची बदनामी करून धमकी दिल्याप्रकरणी पत्रकार संरक्षण कायद्यांतर्गत व बीएनएस नुसार दिनेश फटांगरेवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**"प्रसारमाध्यमे ही लोकशाहीचा चौथा स्तंभ असतात. सरकार-समाजामध्ये चाललेल्या वेगवेगळ्या घटनांचा आढावा घेणे, अन्यायाविरूध्द ठोस भूमिका मांडणे ही वर्तमानपत्राची भूमिका असते. युवावार्ताने वेळोवेळी हीच भूमिका मांडली आहे. त्यामुळे वेगवेगळ्या प्रसंगाला सामोरेदेखील गेलो आहे. परंतू यावेळी मात्र या विकृत इसमाने अतिशय खालची पातळी गाठत केवळ एका वर्तमानपत्राचीच नाही तर संपूर्ण प्रसारमाध्यमांची बदनामी केली आहे. या इसमावर कडक कारवाई झाल्यास समाजाला तो वेगळा संदेश असेल. त्यामुळेच आज सर्व पत्रकार, विविध संघटना यांनी या घटनेचा निषेध करत आपल्या तीव्र भावना व्यक्त केल्या आहेत.  या विकृतीसमोर सलग ३ गुन्हे दाखल होऊनही तो पोलिसांच्या हाती लागत नाही हे दुर्दैव आहे. पोलिसांनी तात्काळ या विकृत इसमाला गजाआड करून कठोर कायदेशीर कारवाई करावी."**

**- फिर्यादी किसन भाऊ हासे (संस्थापक, दैनिक युवावार्ता)**

पत्रकारांना धमकी देणे व बदनामी केल्याप्रकरणी संगमनेर शहरात पत्रकार संरक्षण कायद्याअंतर्गत पहिला गुन्हा दाखल झाला आहे. महाराष्ट्र प्रसार माध्यम व्यक्ती व प्रसारमाध्यम संस्था अधिनियम 2017 कलम 4 (पत्रकार संरक्षण कायदा), तसेच भारतीय न्याय संहिता 2023 मधील कलम 351, 352, 353(1), 356(1) अन्वये संगमनेर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

स्व. अजितदादांविषयी घडलेल्या घटनेची बातमी दैनिक युवावार्ताने प्रकाशित केली. त्या बातमीवर फटांगरे याने कमेंट करत अतिशय खालच्या पातळीवर टीका केली. त्याचबरोबर त्याच्या फेसबुक पेजवर संपादक किसन भाऊ हासे यांच्यावर वैयक्तिक स्वरूपाची अश्लील टीका करणारी पोस्ट केली. याअगोदरही त्याने धमकीवजा अनेक अपमानास्पद पोस्ट केलेल्या आहेत. या सर्व कृत्य त्याने केवळ बातमीतून दुखावल्याने केले आहे, त्यामुळे हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### परशुराम वाडेकर यांच्या उपमहापौर निवडीचे स्वागत

**पुणे (आरंभ पर्व) : पुणे महानगरपालिकेच्या उपमहापौरपदी रिपब्लिकन पक्षाचे राज्य कार्यकारिणीचे संघटक सचिव परशुराम वाडेकर यांची निवड करण्यात आली आहे. या निवडीबद्दल रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष व केंद्रीय मंत्री रामदास आठवले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्याचे मंत्री चंद्रकांतदादा पाटील, पुणे शहराध्यक्ष धीरज घाटे तसेच सभागृह नेते गणेश बिडकर यांचे रिपब्लिकन पक्षाचे प्रदेश सचिव बाळासाहेब जानराव यांनी विशेष पत्राद्वारे अभिनंदन व आभार व्यक्त केले आहेत. परशुराम वाडेकर यांच्या उपमहापौरपदी निवडीबद्दल बाळासाहेब जानराव यांच्यासह माजी उपमहापौर सुनिताताई वाडेकर, नगरसेविका हिमाली कांबळे, नगरसेवक निलेश आल्हाट, नगरसेविका निशा मानवतकर, पुणे शहराध्यक्ष संजय सोनवणे, महिपाल वाघमारे, शाम सदाफुले, जयदेव रंधवे, संगीताताई आठवले, उमेश कांबळे, संदीप धांडोरे, गणेश जगताप आदी पदाधिकाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.**

### विकसित भारत हे प्रत्येक नागरिकाचे स्वप्न असले पाहिजे : अविनाश धर्माधिकारी




**पुणे (आरंभ पर्व) : स्वच्छ, चारित्र्यवान, प्रामाणिक आणि कार्यक्षम प्रशासकीय अधिकारी ही देशाची संपत्ती आहे. आपले काम प्रामाणिकपणे करणारा प्रत्येकजण हा देशभक्त आहे. आपल्या देशाच्या स्वातंत्र्याला जेव्हा शंभर वर्ष पूर्ण होत आहेत तेव्हा 2047 मध्ये भारत एक विकसित राष्ट्र होईल हे प्रत्येक नागरिकांचे स्वप्न असले पाहिजे, आणि त्यासाठी प्रत्येकाने आपल्या क्षेत्रामध्ये प्रामाणिकपणे काम केले पाहिजे असे मत निवृत्त प्रशासकीय अधिकारी आणि चाणक्य मंडल संस्थेचे संस्थापक अविनाश धर्माधिकारी यांनी व्यक्त केले. नागरिक सोशल फाउंडेशन तर्फे आयोजित करण्यात आलेल्या 'भारत 2047 आणि मी' या विषयावरील व्याख्यानमालेत अविनाश धर्माधिकारी बोलत होते. संस्थेचे वक्ता विभाग प्रमुख दीपक मेहेंदळे, विश्वस्त अमेय सप्रे, प्रीतम थोरवेआदि यावेळी उपस्थित होते. अविनाश धर्माधिकारी म्हणाले, तुम्ही कोणत्याही क्षेत्रामध्ये काम करत असाल तेंव्हा काम करताना तुमच्यातील भारत मातेचा कार्यकर्ता कायम जिवंत राहिला पाहिजे. आपल्या देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे केवळ त्या पदावर आहेत म्हणून त्यांचेच केवळ भारत विकसित राष्ट्र असावा हे स्वप्न असले नाही पाहिजे. तर प्रत्येक नागरिकाचे असे स्वप्न असले पाहिजे की माझा भारत हा विकसित राष्ट्र झाला पाहिजे आणि त्यासाठी मी प्रामाणिकपणे काम करत राहील.**

### पुणे महापालिकेतील ४५ नगरसेवकांचे शिक्षण केवळ दहावीपर्यंतच

- **६१ नगरसेवकांचे पदवीपर्यंत शिक्षण**

**पुणे (आरंभ पर्व) : पुणे महापालिकेच्या १६५ नगरसेवकांमध्ये ६१ नगरसेवकांनी पदवीपर्यंतचे शिक्षण घेतले आहे. तर दहावीपर्यंत शिकलेल्या नगरसेवकांची संख्या ४५ आहे. त्यामध्ये इयत्ता दुसरी, चौथी, आठवी, नववीपर्यंत शिक्षण घेतलेल्यांचा समावेश आहे. बारावीपर्यंत शिक्षण घेतलेल्या नगरसेवकांची संख्या ३३ आहेत. केवळ १४ नगरसेवकांचे शिक्षण ‘पदव्युत्तर पदवी’पर्यंत झाले आहे. पुणे महापालिकेची निवडणूक झाली. त्यात ४१ प्रभागांतून १६५ नगरसेवक निवडून आले. त्यात भाजपच्या ११९ , राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार ) २७, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) ३ , काँग्रेसचे १५ आणि उद्धवसेना पक्षाचा १ उमेदवार निवडून आलेला आहे. पुणे शहराचा कारभार हे नगरसेवक हाकणार आहेत. महापालिकेसाठी उमेदवारी अर्ज भरताना इच्छुकांनी सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रातून ही माहिती समोर आली आहे. या १६५ सदस्यांपैकी ३५ टक्के म्हणजे ६१ नगरसेवकांनी पदवीपर्यंत शिक्षण घेतले आहे. तर केवळ ८ टक्के सभासदांनी पदव्युत्तर शिक्षण घेतले आहे. सर्वसाधारण २० टक्के म्हणजे ३३ सदस्यांचे बारावीपर्यंत शिक्षण झाले आहे. तर, २५ टक्के म्हणजे ४५ सदस्य दहावीपर्यंत शिकलेले आहेत.**

### ६ फेब्रुवारीला प्रेक्षकांच्या भेटीला येतोय ‘आफ्टर ओ.एल.सी’




**पुणे (आरंभ पर्व) : मराठी चित्रपटसृष्टीत सध्या चर्चेचा विषय ठरलेला बहुप्रतिक्षित ॲक्शन चित्रपट ‘आफ्टर ओ.एल.सी’ अखेर आपल्या रिलीज डेटसह सज्ज झाला आहे. अनेक दिवसांपासून प्रतीक्षेत असलेला हा दमदार, ॲक्शन-पॅक्ड सिनेमा ६ फेब्रुवारी रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित होताच त्यातील तगडी ॲक्शन, रहस्य आणि थरारक दृश्यांनी प्रेक्षकांची उत्सुकता शिगेला पोहोचली होती. प्रत्येक फ्रेममध्ये वेगळी ऊर्जा आणि कथा उलगडण्याची उत्सुकता निर्माण करणारा ‘आफ्टर ओ.एल.सी’ हा सिनेमा प्रेक्षकांना एक वेगळाच अनुभव देणार आहे. या चित्रपटात कवीश शेट्टी, मेघा शेट्टी, शिवानी सुर्वे, विराट मडके, अश्विनी चवरे यांच्यासह अनेक मराठी कलाकारांची भक्कम टीम पाहायला मिळणार आहे. प्रत्येक कलाकाराने आपल्या भूमिकेला न्याय देत चित्रपट अधिक प्रभावी केला आहे. थरार, रहस्य आणि जोरदार ॲक्शन यांचा उत्तम मेळ या चित्रपटात पाहायला मिळणार आहे.कन्नड सिनेसृष्टीतील दिग्गज दिग्दर्शक सडागारा राघवेंद्र यांनी ‘आफ्टर ओ.एल. सी’चे दिग्दर्शन केले असून, ‘दिपक राणे फिल्म्स’ आणि ‘इंडियन फिल्म फॅक्टरी’ यांच्या संयुक्त विद्यमाने या चित्रपटाची निर्मिती करण्यात आली आहे. हा सिनेमा मराठी भाषेत प्रदर्शित होणार असल्यामुळे मराठी प्रेक्षकांमध्ये त्याबद्दल विशेष उत्सुकता आहे. दमदार कथा, जबरदस्त ॲक्शन आणि रहस्यमय प्रवास घेऊन येणारा ‘आफ्टर ओ.एल.सी’ ६ फेब्रुवारीपासून आपल्या जवळच्या चित्रपटगृहात पाहायला मिळणार आहे. थराराची ही सफर अनुभवण्यासाठी सज्ज राहा!**

संपादक-पत्रकारांसाठी
धमाका ऑफर
वायरलेस बूम माईक
फक्त ₹2999 मध्ये
मुख्य वैशिष्ट्ये:
- वायरलेस बूम (माईक)
- 30 मीटरपर्यंत अगदी क्रिस्टल क्लिअर आवाज
- एका चार्जिंगवर तब्बल १२ तास बॅकअप
- लाइटवेट बूम स्टँड
- प्रोफेशनल बूम डिझाईन
- अँड्रॉइड, आयफोन आणि कॅमेरा सपोर्ट
- माईक कव्हर + चार्जिंग वायर + बूम स्टिक
- माईक व बूमवर तुमचे चॅनल लोगो/ ब्रँड प्रिंट
- चॅनल नाव व लोगोचे पूर्ण कस्टमाइजेशन
- स्पेशल बूम बॅग मोफत

• ऑर्डर दिल्यावर ३ दिवसात बूम तयार
• शहराच्या कुठल्याही कानाकोपऱ्यात घरपोच डिलिव्हरी
• हाय-स्पीड सर्व्हिस उपलब्ध

आता लगेच बुक करा – तुमचे रिपोर्टिंग होईल अजून प्रोफेशनल!
मुख्य कार्यालय
दै. आरंभ पर्व कार्यालय, फ्लॅट नं. १६, चौथा मजला, सोमेश्वर अपार्टमेंट ए, धायरी फाटा, सिंहगड रोड, वडगाव बुद्रुक, शिंदे/अदाते हॉस्पिटल लेन, त्रिमूर्ती हॉस्पिटल समोर, पुणे – ४११०४१
7276314142
8657865702

दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
बुधवार, दि. ०४ फेब्रुवारी २०२६



OFFER... OFFER... OFFER
संपादक-पत्रकारांसाठी
धमाका ऑफर
युट्युब चॅनल साठी खास
शॉर्ट व्हिडिओ (रील्स) पॅकेज
- शॉर्ट व्हिडिओ हे दै. आरंभपर्व कडून बनवले जातील
- शॉर्ट व्हिडिओंमध्ये राजकीय बातम्या, व्हायरल व्हिडिओ असतील
- कालावधी – फक्त १ ते ३ मिनिटे
- चॅनल रिचनुसार ऑटोमॅटिक व्हायरल होणार
- VIEWS आणि SUBSCRIBE वाढवण्यास मदत
- शॉर्ट व्हिडिओंमधून पेमेंट कमाईची संधी

Shorts
फक्त : 8000 रुपये / महिना
( रोज ५ शॉर्ट व्हिडिओ – २६ दिवस )
मुख्य कार्यालय
दै. आरंभ पर्व कार्यालय, फ्लॅट नं. १६, चौथा मजला, सोमेश्वर अपार्टमेंट ए, धायरी फाटा, सिंहगड रोड, वडगाव बुद्रुक, शिंदे/अदाते हॉस्पिटल लेन, त्रिमूर्ती हॉस्पिटल समोर, पुणे – ४११०४१
7276314142
8657865702

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
WE ARE HIRING !
Open Position
VIDEO EDITOR
आपला बायोडाटा खालील ईमेलवर पाठवावा.
for Video Editor असा स्पष्ट उल्लेख करावा.
aparvinfo@gmail.com & ganganepratik4@gmail.com
Call Now ७२७६३१४१४२

# भाजपचे खरे वास्तव

## जितका मोठा घोटाळा, तितके महत्त्वाचे पद

**शाईचा प्रवास | प्रतिक गंगणे**

**(दै. आरंभ पर्व)**

"भ्रष्टाचारमुक्त भारत" हा नारा देत सत्तेत आलेल्या भारतीय जनता पक्षाची (Bharatiya Janata Party) आजची प्रतिमा नेमकी उलटी होत चालली आहे. गेल्या काही वर्षांचा राजकीय प्रवास पाहिला, तर एक धक्कादायक वास्तव समोर येते. ज्याच्यावर घोटाळ्यांचे आरोप अधिक, तोच नेता अधिक महत्त्वाच्या पदावर पोहोचलेला दिसतो. भ्रष्टाचाराविरोधात लढण्याचा दावा करणाऱ्या पक्षातच आज भ्रष्टाचाराची टोळी तयार झाली आहे का, असा प्रश्न सामान्य नागरिक विचारू लागला आहे. एकेकाळी "स्वच्छ, शिस्तबद्ध आणि राष्ट्रवादी" अशी ओळख असलेल्या भाजपाची वाट गेल्या काही वर्षांत चुकलेली स्पष्टपणे जाणवते. आज परिस्थिती अशी झाली आहे की एखाद्या नेत्यावर गंभीर आर्थिक गैरव्यवहारांचे आरोप झाले, चौकशी सुरू झाली किंवा पुरावे समोर आले. तरीही त्याला राजकीय संरक्षण मिळते. उलटपक्षी, अशा नेत्यांना मंत्रीपद, महामंडळे, निवडणूक तिकीट किंवा पक्षातील वरिष्ठ जबाबदाऱ्या दिल्या जातात.

यामुळे "जितका मोठा घोटाळा, तितके मोठे पद" ही म्हण राजकीय वर्तुळात उपरोधाने नव्हे, तर वास्तव म्हणून वापरली जाऊ लागली आहे.

राजकारणात सत्तेसाठी तडजोडी होतात, हे नवे नाही. मात्र नैतिकतेची पूर्णपणे तिलांजली देणे ही बाब लोकशाहीसाठी धोकादायक आहे. भाजपाने ज्या मूल्यांच्या आधारे जनतेचा विश्वास संपादन केला होता, त्याच मूल्यांपासून आज पक्ष दूर जाताना दिसतो. भ्रष्टाचाराच्या आरोपांवर "राजकीय सूड" असा ठराविक बचाव केला जातो, पण सातत्याने तेच कारण पुढे करून सर्व आरोप झाकले जात असतील, तर संशय निर्माण होणे साहजिकच आहे.

"स्वच्छ प्रशासन" हा भाजपाचा कळीचा अजेंडा होता. पण प्रत्यक्षात मोठ्या आर्थिक व्यवहारांतील पारदर्शकता, चौकशी संस्थांचा निष्पक्ष वापर, आणि दोषींवर कारवाई या सर्व बाबींवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

स्वच्छतेचे फक्त जाहिरातीतील फोटो आणि भाषणांपुरते मर्यादित दर्शन झाले, तर प्रत्यक्ष राजकारणात मात्र सत्तेच्या सोयीने डागाळलेल्या नेत्यांना कवच मिळाले. लोकशाहीत सर्वात मोठी ताकद म्हणजे जनतेचा विश्वास. तो विश्वास तुटला, तर कोणतीही सत्ता टिकू शकत नाही. आज सामान्य मतदार हा प्रश्न विचारतो आहे. भ्रष्टाचाराविरोधातील लढा खरा होता, की तो फक्त सत्तेपर्यंत पोहोचण्यासाठीचा एक राजकीय नारा? भाजप आज एका वळणावर उभा आहे. एक मार्ग आत्मपरीक्षणाचा. जिथे भ्रष्टाचाराला खरोखरच आळा घालण्याची इच्छाशक्ती दाखवावी लागेल. दुसरा मार्ग सत्तेच्या मोहात नैतिकतेला गहाण टाकण्याचा.

जर "स्वच्छ भाजप" ही ओळख पुन्हा मिळवायची असेल, तर केवळ विरोधकांवर बोट दाखवून चालणार नाही. स्वतःच्या घरातले डाग साफ करण्याची हिंमत दाखवावी लागेल. अन्यथा, "भ्रष्टाचाराविरोधी पक्ष" ही ओळख इतिहासजमा होऊन "भ्रष्टाचारांचे संरक्षण करणारा पक्ष" अशीच ओळख कायम राहील.



## ज्ञानपीठ करिअर अकॅडमीचा १० वा वर्धापन दिन उत्साहात संपन्न

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

स्पर्धा परीक्षा आणि पोलीस भरती क्षेत्रात गेल्या दशकभरापासून कार्यरत असलेल्या ज्ञानपीठ करिअर अकॅडमीचा १० वा वर्धापन दिन २ फेब्रुवारी रोजी सिंहगड रोडवरील सिद्धार्थ हॉल येथे मोठ्या उत्साहात पार पडला. या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या 'आम्ही पोलीस कसे झालो?' या विशेष यशोगाथा कार्यक्रमाला विद्यार्थ्यांचा उदंड प्रतिसाद लाभला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पुणे शहर राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्याध्यक्ष अक्रूरशेठ कुदळे पाटील, नगरसेवक सचिन मोरे , पीएसआय राहुल नामदे आणि पोलीस भरती मार्गदर्शक निलेश ढाकणे सामाजिक कार्यकर्त्या आश्विनीताई खाडे-पाटिल उपस्थित होते. अकॅडमीचे संचालक प्रा. संग्राम खाडे पाटील यांनी सर्व पाहुण्यांचे स्वागत केले. वर्धापन दिनाचे औचित्य साधून पोलीस भरतीची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी एका विशेष चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये नुकतेच पोलीस दलात भरती झालेल्या विद्यार्थ्यांनी आपला संघर्ष आणि यशाचा प्रवास उलगडला. शनी काळे व शुभांगी तोरडमल (पिंपरी चिंचवड पोलीस), अक्षता गोगावले व मुरली वद्राबादे (मुंबई पोलीस) यांनी "आम्ही पोलीस कसे झालो?" या विषयावर मार्गदर्शन करताना अभ्यासाचे नियोजन, मैदानी चाचणीची तयारी आणि जिद्द कशी टिकवून ठेवावी, याबद्दल मोलाचे सल्ले दिले.

## थोडक्यात पण महत्वाचे

### डॉ. दिनेश गुलाब चव्हाण यांना पीएचडी



**पुणे (आरंभ पर्व) : नाथ जोगी–भराडी समाजाचा पारंपरिक उदरनिर्वाह भिक्षेवर आधारित असताना, डॉ. दिनेश यांनीही हा व्यवसाय स्वतः केला होता . अत्यंत कठीण परिस्थितीत त्यांच्या आई-वडिलांनी त्यांना शिक्षणासाठी सातत्याने पाठबळ दिले आणि त्याच बळावर त्यांनी शिक्षणाचा मार्ग ठामपणे निवडला. पाचवी ते दहावीपर्यंतचे शिक्षण त्यांनी आश्रम शाळेत पूर्ण केले व उच्च शिक्षण हे समाज कल्याणचे होस्टेल मध्ये राहून पूर्ण केले. नाथ जोगी–भराडी या भटक्या समाज परंपरेने अत्यंत मागासलेला व शिक्षणाच्या संधींपासून वंचित राहिलेला आहे. अशा परिस्थितीतून पुढे येत वैद्यकीय शिक्षण पूर्ण करून महाराष्ट्रात नाथ जोगी–भराडी या भटक्या समाजातून पीएचडी पदवी प्राप्त करणारे डॉ. दिनेश गुलाब चव्हाण हे पहिले व्यक्ती ठरले आहेत. त्यांनी मुंबई येथील नामवंत सेठ जी.एस. वैद्यकीय महाविद्यालय येथून डॉ. अमिता मेहता यांच्या मार्गदर्शनाखाली पीएचडी पदवी प्राप्त केली. डॉ. दिनेश गुलाब चव्हाण हे यवतमाळ जिल्ह्यातील आदिवासी व मागासलेल्या पट्ट्यातील करणवाडी (ता. पांढरकवडा) येथील मूळचे रहिवासी आहेत. सध्या ते ढोले पाटील कॉलेज ऑफ फिजिओथेरपी, पुणे येथे प्राध्यापक व विभाग प्रमुख म्हणून कार्यरत आहेत. या यशाबद्दल ढोले पाटील एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन श्री सागर ढोले पाटील यांनी त्यांचे अभिनंदन करून विशेष पारितोषिक जाहीर केले. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गुणशेकरण आणि डॉ. अक्षय खटावकर यांनीही त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. डॉ. दिनेश गुलाब चव्हाण यांचे हे यश भटक्या व वंचित समाजातील विद्यार्थ्यांसाठी निश्चितच प्रेरणादायी ठरणारे आहे.**

## उदय लळीत, अशोक सराफ यांना जीवनगौरव पुरस्कार



- **सूर्यदत्त जीवनगौरव व राष्ट्रीय पुरस्कारांची घोषणा**
- **शनिवारी (दि. ७) होणार वितरण**
- **पद्मश्री प. पू. डॉ. चंदनाजी महाराज यांना 'सूर्यदत्त ग्लोबल पीस गांधीयन फिलॉसॉफी अवॉर्ड २०२६'**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशन संचालित सूर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटच्या २८ व्या वर्धापनदिनानिमित्त देण्यात येणारे 'सूर्यदत्त जीवनगौरव पुरस्कार' व सूर्यदत्त राष्ट्रीय पुरस्कार' घोषित करण्यात आले आहेत. येत्या शनिवारी (दि. ७) सायंकाळी ५.३० वाजता बंटारा भवन, बाणेर, मुंबई-पुणे महामार्ग येथे हे पुरस्कार सन्मानपूर्वक वितरित केले जाणार आहेत, अशी माहिती 'सूर्यदत्त'चे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांनी पत्रकार परिषदेत दिली. प्रसंगी 'सूर्यदत्त'च्या सहयोगी उपाध्यक्षा स्नेहल नवलखा, मुख्य कार्यकारी अधिकारी अक्षित कुशल, मुख्य विकास अधिकारी सिद्धांत चोरडिया, जनसंपर्क व्यवस्थापिका स्वप्नाली कोगजे, सल्लागार समिती सदस्य जीवराज चोले आदी उपस्थित होते. प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया म्हणाले, "अहिंसा विश्वभारतीचे संस्थापक आचार्य डॉ. लोकेश मुनीजी यांच्या अध्यक्षतेखाली सर्वोच्च न्यायालयाचे माजी सरन्यायाधीश उदय लळित यांच्या हस्ते या पुरस्कारांचे वितरण होणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून भारतीय जनता पार्टीचे माजी राष्ट्रीय उपाध्यक्ष श्याम जाजू, एअरमार्शल (निवृत्त) भूषण गोखले, माजी केंद्रीय निवडणूक आयुक्त टी. एस. कृष्णमूर्ती, ज्येष्ठ अभिनेते रझा मुराद, एमआयटीचे अधिष्ठाता प्रा. डॉ. शरदचंद्र दराडे आदी उपस्थित राहणार आहेत." पद्मश्री परमपूज्य आचार्य डॉ. चंदनाजी महाराज (ताई माँ) यांना 'सूर्यदत्त ग्लोबल पीस गांधीयन फिलॉसॉफी अवॉर्ड २०२६' हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

## युट्यूब मालिकेमुळे कलाविश्वाला एक नवीन व्यासपीठ मिळेल

**मेघराज राजेभोसले**

- **'तुझ्याचसाठी - एक मन विखुरलेलं' या वेबमालिकेचा भव्य लॉन्च सोहळा उत्साहात संपन्न**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

चित्रपट, ओटीटी आणि टीव्ही या तीनही माध्यमांचा आपला प्रेक्षक वर्ग , आर्थिक गणित वेगवेगळे आहे. अनेकांना मालिका करायच्या आहेत मात्र टीव्हीच्या मर्यादा लक्षात घेता सर्वांना संधि मिळतेच असे नाही. आज मराठी मनोरंजन विश्व एक नवीन सुरुवात करत आहे ते म्हणजे युट्यूब मालिका, तुझ्याचसाठी - एक मन विखुरलेलं या मालिकेमुळे मराठी कलाविश्वाला नवीन व्यासपीठ मिळेल असा विश्वास अखिल भारतिय मराठी चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराज राजेभोसले यांनी व्यक्त केला. पुणे श्रमिक पत्रकार संघ येथे आयोजित कार्यक्रमात 'तुझ्याचसाठी - एक मन विखुरलेलं; या पहिल्या मराठी यूट्यूब मालिकेचा लॉन्च सोहळा उत्साहात संपन्न झाला, यावेळी राजेभोसले बोलत होते. याप्रसंगी प्रसिद्ध गायक साजन बेंद्रे, सुप्रसिद्ध अभिनेते शिवभक्त सचिन गवळी, या वेबमालिकेचे निर्माते सर्जेराव गायकवाड आणि राम अश्रुजी पाटील , दिग्दर्शक ओंकार नागनाथ पिंपळे यांच्यासह मालिकेतील सर्व कलाकार व तंत्रज्ञ उपस्थित होते. पुढे बोलताना मेघराज राजेभोसले म्हणाले, आपल्याकडे गुणवंत कलाकार अनेक आहेत , माध्यमांच्या मर्यादेमुळे सर्वांना संधि मिळत नाही या मालिकेच्या निमित्ताने एक नवीन व्यासपीठ कलाकारांना मिळेल, या मालिकेचे निर्माते त्यांचे आर्थिक गणीतही जुळवतील कारण निर्मात्याला त्यांचे पैसे रिटर्न मिळणे अत्यंत महत्वाचे असते. नव्या माध्यमावर ही संपूर्ण टीम मेहनत घेत आहे त्यांना निश्चित यश मिळेल, तसेच मालिकेच्या संकल्पनेचे कौतुक करत, मराठी डिजिटल माध्यमांसाठी ही मालिका मैलाचा दगड ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. याप्रसंगी साजन बेंद्रे, सचिन गवळी, सर्जेराव गायकवाड, राम पाटील आणि दिग्दर्शक ओंकार नागनाथ पिंपळे यांनी आपल्या मनोगतातून मालिकेच्या निर्मिती मागील भूमिका विषाद केली. 'तुझ्याचसाठी - एक मन विखुरलेलं' ही पहिली यूट्यूब मालिका येत्या 9 फेब्रुवारी पासून सोमवार ते शुक्रवार सायंकाळी 8 वाजता प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सागर सोनवणे यांनी केले.



## गुंतवणूकदारांसाठी चालना देण्यासाठी कोटक सर्व्हिसेस फंड सुरू

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**


कोटक महिंद्रा अ‍ॅसेट मॅनेजमेंट कंपनी लिमिटेड ("KMAMC"/"कोटक म्युच्युअल फंड") ने कोटक सर्व्हिसेस फंड या सेवा-आधारित थीमवर आधारित ओपन-एंडेड इक्विटी योजनेची घोषणा केली आहे. ही नवीन फंड ऑफर (NFO) गुंतवणूकदारांना भारताच्या मुख्य वाढीच्या इंजिनमध्ये – सेवा क्षेत्रात – गुंतवणुकीची संधी देते. सेवा क्षेत्र देशाच्या GVA (ग्रॉस व्हॅल्यू अ‍ॅडेड) मध्ये 55% योगदान देते आणि देशातील 31.5% कामगारांना1 रोजगार देते. ग्राहक सेवा, दूरसंचार, आरोग्यसेवा, लॉजिस्टिक्स, वित्तीय सेवा, आयटी, ऊर्जा आणि तेल व वायू यांसारख्या विविध क्षेत्रांमध्ये जलद वाढ होत आहे. त्यामुळे भारताची सेवा अर्थव्यवस्था दीर्घकालीन गुंतवणूकदारांसाठी* अनेक संरचनात्मक वाढीचे घटक उघड करत आहे.

कोटक सर्व्हिसेस फंड ही बहुआयामी संधी ग्रोथ अ‍ॅट रिझनेबल प्राइस (GARP) आणि BMV फ्रेमवर्क (बिझनेस, मॅनेजमेंट,व्हॅल्यू) या शिस्तबद्ध गुंतवणूक धोरणाद्वारे साध्य करण्याचा प्रयत्न करेल.

# दरोडा व सरकारी कामात अडथळा प्रकरणातील आरोपीला मकोका अंतर्गत जामीन

**सोलापूर (दै. आरंभ पर्व)**

आर्थिक फायद्यासाठी घातलेला दरोडा व सरकारी कामात अडथळा आणल्याबद्दल मकोका (मोक्का) अंतर्गत केलेली कारवाई प्रकरणात मंगळवेढा पोलीस स्टेशन ग्रामीण सोलापूर गु.र. नं.139 /2018 दिनांक 23/04/2018 नुसार भारतीय दंड विधान संहिता (भादवीसं)1860 चे कलम 395, 308, 353, 115, 189, 504, 506, भा.द.वि.स कलम 4/25, शस्त्र अधिनियम 1959 सह पर्यावरण कायदा कलम 9व15 सह मोटार वाहन कायदा कलम 3(1)/181,130/177सह महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम 1999 चे कलम 3(1)(ii),3(2),3(4) प्रमाणे आरोपी नं.(9)विकास उर्फ विक्या भीमसिंग उर्फ भिमशा भोसले वय 55 वर्ष रा. तामदर्डी, ता. मंगळवेढा ,जि.सोलापूर यांच्याविरुद्ध



गुन्हा नोंदविण्यात आला होता. गुन्ह्याची थोडक्यात हकीकत:_ यातील नमूद तारीख वेळ व ठिकाण यातील आरोपी मजकूर यांनी संगणमत करून मौजे तांडूर ता.मंगळवेढा गावचे शिवारातील बाराभाई येथील भीमा नदीचे पात्रात स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी भीमा नदीच्या पात्रातून अवैधरित्या गौण खनिज वाळू चोरून पर्यावरणाचा ऱ्हास होईल अशी कृत्य करीत असताना मोटार टेम्पो क्रमांक एम एच १० ए ४५२७ व ट्रॉलीमध्ये दोन ब्रास वाळू सह 1, 70,000/_ रुपये किमतीचे मुद्देमाला सह मिळून आले यातील फिर्यादी व सोबतच्या स्टाफ त्याचे कायदेशीर कर्तव्य पार पाडीत असताना त्यांच्या कर्तव्यात बाधा आणून शिवीगाळ करून जिवे ठार मारण्याची धमकी चिथावणी नुसार जिवे ठार मारण्याचा उद्देशाने दांडपट्टा चालवून त्याचे अंगावर ट्रॅक्टर घालण्याचा प्रयत्न केला. सदर बिगर नंबरचा वाळूने ट्रॉली भरलेली ट्रॅक्टर उपस्थित स्टाफ वर दहशत निर्माण करून बळजबरीने घेऊन गेले वगैरे मजकुराची फिर्याद दिल्याने गुन्हा दाखल आहे.

सदर गुन्ह्यातील आरोपी क्र.9 हा अद्याप अटक होणे बाकी होता, सदर आरोपीस मंगळवेढा पोलीस ठाणे गु.र.नं. 716/ 2025 प्रमाणे दाखल गुन्ह्यात अटक करण्यात आलेली होती. सदरचा आरोपीस त्यानंतर त्या गुन्ह्यातून वर्ग करून मंगळवेढा पोलीस ठाणे गु.र. नं. 84/ 2018 या गुन्ह्यात अटक केली होती. नमूद आरोपी यास गुन्ह्यातून वर्ग करून घेऊन मे. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी सो कोर्ट मंगळवेढा यांना रिपोर्ट देऊन वर्ग करून घेऊन, अटकपूर्व वैद्यकीय तपासणी करून त्यांचा अंगझडती अटक पंचनामा करून नमूद गुन्ह्यात दिनांक 9/ 12/ 2025 रोजी 20 /19 वाजता अटक केली. संबंधित प्रकरणातील तपास दरम्यान आरोपीच्या ताब्यातून काही एक मुद्देमाल जप्त करण्यात आलेला नव्हता. सदर प्रकरणातील आरोपी नामे विकास भिमशा भोसले यांनी जामीन अर्ज मे.जिल्हा व सत्र न्यायालय पंढरपूर येथे दाखल केला होता. अर्जदाराच्या वतीने विद्वान वकिलांनी असे सादर केले की अर्जदारावर असे आरोप आहेत की त्याने इतर काही व्यक्ती सोबत वाळू उत्खनन केले हा अर्जदार वाळू उत्खनन करण्याचे उद्देशाने स्थापन केलेल्या संघटनेच्या सदस्य आहे, त्याने पैसे कमावण्यासाठी गुन्हा केला आहे, अर्जदाराच्या वकिलाने युक्तिवादामध्ये असे सांगितले की या अर्जदाराचे नाव सह आरोपीने घेतलेले आहे याशिवाय या अर्जदारा विरुद्ध इतर कोणतेही पुरावा नाही. सध्याचा अर्जदार 16/ 12/ 25 पासून तुरुंगात आहे. आतापर्यंत पोलिसांनी कोणताही पुरावा गोळा केला नाही इतर काही आरोपी विरुद्ध आधीच दोषारोप पत्र दाखल केले आहे .त्यात जामीनवर सह आरोपीची सुटका झाली आहे आणि सह आरोपी नं. 3व 4 यांचे अटकपूर्व जामीन वर सुटका झालेला आहे. म्हणून अर्ज मंजूर करण्यात यावा अशी अर्जदाराचे वकिलाने युक्तीवादामध्ये विनंती केली. विद्वान ए पी पी ने असे सादर केले की या अर्जदाराविरुद्ध पुरेसे पुरावे आहे, हा अर्जदार फरार होता, त्यामुळे तपास अधिकाऱ्याने अर्जदाराविरुद्ध योग्य तपास केला नाही,जर या आजाराला जामीनवर सोडण्यात आले, तर तो साक्षीदाराला धमकावेल आणि सरकारी पक्षावr व साक्षीदारांना छेडछाड करेल,तो पुन्हा गुन्हा करेल म्हणून अर्ज रद्द करण्यात यावा अशी विनंती केली.

मे. सत्र न्यायालयाकडून जामीन निर्णय देताना, अर्जदाराविरुद्ध सादर करण्यात आलेला मकोकाची तरतूद लागू आहे की नाही हे पाहणे आवश्यक आहे, प्रथमदर्शनी अर्जदाराचे सहभाग आहे आणि त्याने व मोक्का कायद्यांतर्गत गुन्हा केला असावा या प्रकरणात एफ आय आर मध्ये माहिती देणाऱ्याने आरोप केला आहे की त्यांचा या अर्जदाराचे नाव घटनास्थळी पकडलेल्या व्यक्तीकडून कळले, याशिवाय या अर्जराविरुद्ध एपीपीने कोणताही पुरावा सादर केलेला नाही, यात शंका नाही की हा अर्जदार होता.

दिनांक 16/ 12/ 2025 रोजी अटक करण्यात आले होते अर्जदाराविरुद्ध एफ आय आर दाखल 2018 मध्ये करण्यात आले होते या तपासातही या अर्जराविरुद्ध कोणतेही योग्य पुरावे आढळले नाहीत त्यामुळे कथीत गुन्ह्यात या अर्जदाराचा सकारात्मक सहभाग नाकारला जातो, परंतु हा अगदी प्राथमिक टप्पा आहे.

आणि या टप्प्यावर हे मे.न्यायालय कोणतेही भाष्य करू शकत नाही की हा अर्जदार पूर्णपणे निर्दोष आहे, त्यांनी गुन्हा केला आहे की नाही हे सुनावणीच्या वेळी प्रथमदर्शनी विचारात घेतले जाईल कोणताही सहभाग रेकॉर्डवर नाही तसेच इतर सह आरोपीला आधीच जामीनवर सोडण्यात आले होते या सर्व कारणामुळे तो जामीन वर सोडण्यास पात्र आहे म्हणून जामीन चा अर्ज मंजूर करण्यात आला आहे.

सदर प्रकरणात अर्जदारा तर्फे ॲड. आर. बी. बायस, ॲड. बबिता. एल. काळे. ॲड. संकेत पवार व लखन काळे काम पाहिले.

## थोडक्यात पण महत्वाचे

### भारतात हायरिंग प्रक्रिया अधिक आव्हानात्मक




मुंबई (आरंभ पर्व) : भारतातील हायरिंग बाजार वेगाने विस्तारत असला, तरी योग्य टॅलेंट शोधणे रिक्रूटर्ससाठी अधिकच कठीण होत असल्याचे चित्र समोर आले आहे. LinkedInच्या नव्या संशोधनानुसार, ७४ टक्के रिक्रूटर्सना पात्र उमेदवार शोधण्यासाठी पूर्वीपेक्षा अधिक वेळ आणि प्रयत्न करावे लागत आहेत. याच कालावधीत, हायरिंगचे प्रमाण महामारीपूर्वीच्या तुलनेत तब्बल ४० टक्क्यांनी वाढले आहे. या आव्हानामागील प्रमुख कारण म्हणजे अर्जांची संख्या आणि उमेदवारांच्या गुणवत्तेमधील वाढती तफावत. अर्ध्याहून अधिक रिक्रूटर्स (५३%) एआय-निर्मित अर्जांमध्ये लक्षणीय वाढ झाल्याचे सांगतात, तर ४७ टक्के रिक्रूटर्स मागणीतील कौशल्यांची सातत्याने कमतरता असल्याचे नमूद करतात. जवळपास ४८ टक्के रिक्रूटर्ससाठी कमी दर्जाचे किंवा दिशाभूल करणारे अर्ज वेगळे करणे ही मोठी डोकेदुखी ठरत असून, त्यामुळे संपूर्ण हायरिंग प्रक्रिया संथ होत आहे. याचा थेट परिणाम म्हणजे कामगार बाजारपेठेत प्रचंड स्पर्धा वाढली आहे. लिंक्डइन प्लॅटफॉर्मवरील डेटानुसार, भारतात प्रत्येक रिक्त पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांची संख्या २०२२ पासून दुपटीहून अधिक झाली आहे. तसेच, ७२ टक्के प्रोफेशनल्स सांगतात की ते २०२६ मध्ये सक्रियपणे नोकरी शोधत आहेत, मात्र ८५ टक्क्यांना या प्रक्रियेसाठी आपण पुरेसे सज्ज नसल्याची भावना आहे.

### जगण्यातला आनंद शोधा - डॉ. चेतनानंद महाराज

राजगुरूनगर (आरंभ पर्व) : जीवन अमूल्य असून ते पुन्हा मिळणार नाही. त्याचा सदुपयोग करा. आपला जन्म कशासाठी झाला, त्या मागचा उद्देश समजून घेऊन जीवनातला आनंद शोधा असे प्रतिपादन आध्यात्मिक गुरू व वक्ते डॉ. चेतनानंद महाराज यांनी केले. ते खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत जीवनाला वन्समोअर नाही या विषयावर बोलत होते. या प्रसंगी संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, सुशील शिंगवी, व्याख्यानमाला समिती अध्यक्ष ॲड. राजमाला बुट्टेपाटील, प्राचार्य डॉ. एस.एस.पिंगळे, डॉ.एस.एस.जगताप, उपप्राचार्य प्रा. व्ही.बी.दौंडकर, प्रबंधक एन.एम.शिंदे उपस्थित होते. चेतनानंद महाराज पुढे म्हणाले की, चारित्र्य, ज्ञान, आत्मशक्ती असणाऱ्यांनाच जगात किंमत आहे. सुंदरतेला चारित्र्याची जोड हवी. सावित्रीबाई फुले, राजमाता जिजाऊ, अहिल्याबाई होळकर अशा कर्तबगार महिलांचे कर्तृत्व ही त्यांची सुंदरता होती.

### दीवाने इंडिया का दीवाना हमसफर मोहिमेचे अनावरण

पुणे (आरंभ पर्व) : आयसीसी मेन्स टी20 वर्ल्ड कप 2026 ची उत्सुकता वाढत असताना ह्युंदाई मोटर इंडिया लि.(एचएमआयएल) ने आयसीसीच्या भागीदारीने दीवाने इंडिया का दीवाना हमसफर ही ब्रँड कँपेन सुरू केली आहे.क्रिकेटप्रती असलेल्या प्रेम साजरे करण्यासाठी या एकात्मिक मोहिमेत ऑन ग्राऊंड अनुभव,आयकॉनिक मुमेंटस,डीलरशिप ॲक्टीव्हेशन आणि मास मिडिया आऊटरिचचा समावेश आहे.

### फेव्हीक्रिल आर्ट चॅप्टर उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद


पुणे (आरंभ पर्व) : भारतातील लोकप्रिय आर्ट ॲन्ड क्राफ्ट ब्रँड असलेल्या फेव्हीक्रिल तर्फे आयोजित द आर्ट चॅप्टर - सेलिब्रेटिंग द लोकल या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. भारतातील स्थानिक कला समुदायाला सक्षम करणे,प्रोत्साहन देणे या उद्देशाने सुरू करण्यात आलेला हा पहिलाच उपक्रम आहे. नुकतेच पुण्यातील राजा रवी वर्मा आर्ट गॅलरी येथे पार पडलेल्या प्रदर्शनाला 3000 हून अधिक कला रसिकांनी भेट दिली. या प्रदर्शनात 80 हून अधिक कलाकारांच्या कलाकृती सादर करण्यात आल्या होत्या.

# स्त्री लैंगिक उपभोगाची वस्तू नाही

शाईचा प्रवास | प्रतिक गंगणे

(दै. आरंभ पर्व)

समाज कितीही आधुनिक, प्रगत किंवा तंत्रज्ञानाने समृद्ध झाला तरी स्त्रीकडे पाहण्याची मानसिकता अनेक ठिकाणी अजूनही मागासलेली दिसते. स्त्रीला एक स्वतंत्र, विचारशील आणि निर्णयक्षम व्यक्ती मानण्याऐवजी तिच्या शरीरापुरतेच मर्यादित केले जाते. "स्त्री म्हणजे सौंदर्य", "स्त्री म्हणजे आकर्षण" अशी संकुचित चौकट तयार करून तिचे वस्तूकरण केले जाते. ही केवळ सामाजिक चूक नाही, तर गंभीर मानसिक आणि सांस्कृतिक विकृती आहे.



स्त्री ही लैंगिक उपभोगाची वस्तू नाही; ती माणूस आहे. पूर्ण अस्तित्व असलेला, स्वाभिमानी आणि समान हक्कांचा. पण जाहिराती, मनोरंजनसृष्टी, सोशल मीडिया आणि अगदी दैनंदिन बोलण्यातून स्त्रीचे लैंगिकीकरण सातत्याने घडवले जाते. कपडे, शरीरयष्टी, त्वचेचा रंग, सौंदर्य यांवरून स्त्रीचे मूल्यमापन केले जाते. तिच्या बुद्धिमत्तेपेक्षा, कर्तृत्वापेक्षा आणि व्यक्तिमत्त्वापेक्षा देहाला अधिक महत्त्व दिले जाते. यामुळे समाजात एक धोकादायक संदेश जातो. की स्त्री ही पाहण्यासाठी, वापरण्यासाठी आणि उपभोगण्यासाठी आहे.

या मानसिकतेचे परिणाम अतिशय गंभीर आहेत. स्त्रीकडे वस्तू म्हणून पाहिले गेले की तिच्या संमतीचे महत्त्व संपते. छेडछाड, लैंगिक अत्याचार, घरगुती हिंसा, ऑनलाईन ट्रोलिंग, शरीरावर टीका. या सगळ्यांची मुळे याच वस्तूकरणात आहेत. "तीच जबाबदार आहे", "तिने असे कपडे का घातले?", "तिने विरोध का केला नाही?" असे प्रश्न विचारले जातात, जे प्रत्यक्षात गुन्हेगाराला संरक्षण देणारे असतात. दोषी व्यक्तीऐवजी स्त्रीलाच दोष देण्याची प्रवृत्ती ही समाजाच्या नैतिक अधःपतनाची निशाणी आहे.

स्त्रीचे अस्तित्व केवळ देहापुरते मर्यादित नाही. ती ज्ञानाची निर्माती आहे, कुटुंबाची आधारस्तंभ आहे, अर्थव्यवस्थेची वाहक आहे आणि समाजाच्या प्रगतीची प्रेरक शक्ती आहे. शेतात राबणारी शेतमजूर, कारखान्यात काम करणारी कामगार, रुग्णसेवा करणारी परिचारिका, न्याय देणारी न्यायाधीश, धोरण ठरवणारी प्रशासक, विज्ञानात संशोधन करणारी शास्त्रज्ञ. प्रत्येक क्षेत्रात स्त्रीचे योगदान अमूल्य आहे. तिच्या श्रमांशिवाय समाजाची चाकेच थांबतील.

तरीही स्त्रीच्या कामाला दुय्यम स्थान दिले जाते, तिच्या निर्णयक्षमतेवर शंका घेतली जाते आणि तिच्या स्वातंत्र्यावर बंधने लादली जातात. "घरचं काम म्हणजे कामच नाही", "स्त्रीने जास्त पुढे जाऊ नये", "स्त्रीने सहनशील असावं". या विचारधारांनी स्त्रीला गप्प बसायला शिकवले. प्रत्यक्षात सहनशीलतेच्या नावाखाली तिच्यावर अन्याय लादला गेला.

माध्यमांची भूमिका येथे अत्यंत महत्त्वाची आहे. चित्रपट, मालिका, जाहिराती आणि डिजिटल कंटेंटमधून स्त्रीचे एकांगी चित्रण थांबले पाहिजे. स्त्रीला केवळ आकर्षक देह म्हणून दाखवण्याऐवजी तिचे संघर्ष, तिची ताकद, तिची स्वप्ने आणि तिचे यश दाखवले गेले पाहिजे. वास्तववादी आणि सन्मानजनक चित्रणच समाजाच्या मानसिकतेत बदल घडवू शकते.

शिक्षण हा बदलाचा सर्वात प्रभावी मार्ग आहे. शाळेपासूनच मुला-मुलींना लैंगिक समानता, परस्पर सन्मान, संमतीचे महत्त्व आणि जबाबदारीची जाणीव दिली पाहिजे. "नाही म्हणजे नाही" हे शिकवणे जितके महत्त्वाचे आहे, तितकेच स्त्रीला स्वतःचे मत मांडण्याचा अधिकार आहे हे मान्य करणेही गरजेचे आहे. कुटुंबात मुलांना स्त्री-पुरुष समानतेचे संस्कार दिले, तरच उद्याची पिढी अधिक संवेदनशील बनेल.

कायद्यांची अंमलबजावणीही तितकीच कठोर आणि प्रभावी असली पाहिजे. महिलांवरील अत्याचारांच्या प्रकरणांत तात्काळ कारवाई, जलद न्याय आणि दोषींना कठोर शिक्षा मिळाली पाहिजे. कायदे केवळ कागदावर न राहता प्रत्यक्षात उतरले, तरच पीडित स्त्रियांना न्याय मिळेल आणि गुन्हेगारांमध्ये भीती निर्माण होईल.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे, बदलाची सुरुवात प्रत्येक व्यक्तीने स्वतःपासून केली पाहिजे. आपल्या भाषेतून, विनोदांतून, नजरेतून आणि वर्तनातून आपण स्त्रीला कसे पाहतो, हे तपासणे गरजेचे आहे. स्त्रीचा सन्मान करणे म्हणजे उपकार नाही; तो तिचा हक्क आहे.

स्त्री लैंगिक उपभोगाची वस्तू नाही. ती सन्मान, सुरक्षितता, स्वातंत्र्य आणि समान संधींची हकदार आहे. स्त्रीचा सन्मान ज्या समाजात होतो, तोच समाज खऱ्या अर्थाने सुसंस्कृत, प्रगत आणि मानवतावादी असतो. स्त्रीला वस्तू म्हणून नव्हे, तर माणूस म्हणून स्वीकारणे. हीच खरी सामाजिक क्रांती आहे.

## 'हसरतें' तिसऱ्या सीझनसह सह पुन्हा प्रेक्षकांच्या भेटीला




मुंबई (दै. आरंभ पर्व)


- सहा महिला, सहा कथा आणि स्वतःला निवडण्याची एक अटूट गरज

भारतातील आघाडीच्या डिजिटल मनोरंजन प्लॅटफॉर्मपैकी एक असलेल्या हंगामा ओटीटीने आपल्या लोकप्रिय अँथॉलॉजी हसरतें चा तिसरा सीझन जाहीर केला आहे. महिलांच्या मनातील भावना, न बोललेल्या इच्छा आणि शांत बंडखोरी यांचा शोध घेणाऱ्या या मालिकेचा नवा अध्याय प्रेक्षकांसमोर येत आहे. पहिल्या दोन सीझनच्या मोठ्या यशानंतर, सीझन 3 मध्ये गुदमरून टाकणारी वैवाहिक नाती, कठोर परंपरा, राजकीय डावपेच आणि भावनिक दुर्लक्षामुळे घडलेल्या आयुष्यांच्या कथा अधिक खोलवर मांडल्या आहेत. गेल्या काही वर्षांत हसरतें ने सहसा न सांगितल्या जाणाऱ्या कथा मांडत आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. महिलांच्या इच्छा, ओळख आणि समाजाच्या बंधनांमधील संघर्ष प्रामाणिकपणे दाखवल्यामुळे ही मालिका प्रेक्षकांच्या मनाला भिडली आहे. सीझन 3 मध्ये थ्रिलर, गुन्हेगारी आणि ड्रामा यांचा संगम असलेले सहा प्रभावी भाग आहेत. प्रत्येक कथा धाडसी, भावनिक आणि माणुसकीने भरलेली आहे. हसरतें सीझन 3 चे पहिले दोन भाग 22 जानेवारी रोजी प्रदर्शित झाले, त्यानंतर 27 जानेवारी रोजी आणखी दोन भाग आले, आणि शेवटचे दोन भाग 4 फेब्रुवारी रोजी प्रदर्शित होतील. हसरतें सीझन 3 मध्ये सहा प्रभावी कथा आहेत, ज्या महिलांच्या शांततेतून, संघर्षातून आणि आत्मजागृतीच्या प्रवासातून उलगडतात. हल्ला बोल या कथेत ज्योतीची गोष्ट आहे. ती छळ सहन करणारी पत्नी असून, तिला बाहुली म्हणून राजकारणात ढकलले जाते.

## 'देवखेळ'मध्ये अंकुश चौधरी आणि प्राजक्ता माळी झळकणार, स्ट्रीमिंग सुरू

पुणे (दै. आरंभ पर्व)

ZEE5चा नवीन मराठी ओरिजनल देवखेळचे स्ट्रीमिंग आता केवळ मराठी ZEE5वर सुरू होत आहे. चित्तवेधक मानसशास्त्रीय गुन्हेगारी थरारपटाची ही मालिका कोकणातील समृद्ध लोकपरंपरेतून प्रेरणा घेते आणि शिमगा (होळी) सणाच्या उत्कंठावर्धक पार्श्वभूमीवर श्रद्धा, भीती आणि मानवी विवेक यांच्या नाजूक भावनांचा शोध घेते. रत्नागिरी जिल्ह्यातील देवतालीच्या किनारपट्टीवरील गावावर आधारित, देवखेळचे कथानक एका थरारक परिस्थितीभोवती गुंफले आहे. दरवर्षी, होळी पौर्णिमेच्या रात्री एक मृत्यू होतो. कथा-कल्पनेत रमणारे गावकरी या




मृत्यूंचे श्रेय शंकासुरला देतात. शंकासूर हे न्यायाचे प्रतीक म्हणून स्थानिक पातळीवर पूजले जाणारे एक पौराणिक लोक व्यक्तिमत्व आहे. जसजसे विधी सखोल होत जातात आणि विश्वास तर्कावर मात करू लागतो, तसतसे मौन हा जगण्याचा एक मार्ग बनतो. भय लोककथांच्या आड पिढ्यांनपिढ्या सत्य दडपून राहते. दंतकथा हा हेतू म्हणून स्वीकारण्यास नकार देणाऱ्या इन्स्पेक्टर विश्वास सरंजामेच्या एंट्रीने कथेला निर्णायक वळण लागते. काळजीपूर्वक लपवून ठेवलेल्या गुन्ह्याचा तपास करत असताना, देवखेळ विश्वास आणि तर्कशास्त्र, परंपरा आणि सत्य यांच्यातील तणावपूर्ण मानसिक लढाई सुरू करतो. या मालिकेत इन्स्पेक्टर विश्वास सरंजामेच्या भूमिकेत अंकुश चौधरीसह, प्राजक्ता माळी, यतीन कार्येकर, अरुण नलावडे, वीणा जामकर आणि मंगेश देसाई यांच्या प्रमुख भूमिका आहेत. प्रीमियरपूर्वी, मुंबईत देवखेळच्या स्पेशल प्रिव्ह्यूचे आयोजन करण्यात आले. ज्यात मुख्य कलाकारमंडळी म्हणजे अंकुश चौधरी, प्राजक्ता माळी, शिवानी रांगोळे आणि सुबोध भावे यांच्यासह मराठी चित्रपटसृष्टीतील अनेक प्रमुख चेहरे उपस्थित होते. प्रेक्षकांना शंकासुराच्या जगात पूर्णपणे बुडवून टाकल्याने हे प्रदर्शन यशस्वी ठरले. उत्सवांच्या काळात एक विशिष्ट स्थानिक स्पर्श जोडत, विशेष ब्रँडेडदेवखेळ-ZEE5 ऑटोरिक्षा प्रमुख आकर्षण ठरली. ही ऑटोरिक्षा मालिकेच्या खोलवर रुजलेल्या परंतु लक्षवेधी सौंदर्याला प्रतिबिंबित करते.

## सारेगमप लिटील चॅम्प्स पर्वातील प्रत्येक क्षण अविस्मरणीय - कार्तिकी गायकवाड

राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)

दूरचित्रवाणीवरील सारेगमप लिटील चॅम्प्स पर्वामध्ये सहभागी होऊन विजेता होण्याचा बहुमान मिळाला. जगभरातील प्रेक्षकांचे प्रेम मिळाले. लतादीदींसह अनेक दिग्गज मान्यवरांचे आशीर्वाद मिळाले. त्या पर्वातील प्रत्येक सोनेरी क्षण माझ्यासाठी अविस्मरणीय अनुभव असून यामुळे मला नवी ओळख मिळाल्याचे प्रतिपादन प्रसिद्ध गायिका कार्तिकी गायकवाड यांनी केले. त्या खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत एक सुरेल मैफिल या विषयावर बोलत



होत्या. या प्रसंगी संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, सतीश नाईकरे, व्याख्यानमाला समिती अध्यक्ष ॲड. राजमाला बुट्टेपाटील, प्राचार्य डॉ. एस.एस.पिंगळे, डॉ.एस.एस.जगताप, उपप्राचार्य प्रा. व्ही.बी.दौंडकर, प्रबंधक एन.एम.शिंदे उपस्थित होते.कार्तिकी गायकवाड पुढे म्हणाल्या की आमच्या कुटुंबात संगीताचे वातावरण असून वडील पं. कल्याणजी गायकवाड यांनी माझ्यावर संगीताचे संस्कार केल्यामुळे आज मी इथपर्यंत पोहोचू शकले. संगीत कलेचा वारसा जपत मी संगीत क्षेत्रात नवनवीन गाणी करून रसिकांपर्यंत पोचवणार आहे. या मुलाखतीत त्यांनी आळंदी ते महाराष्ट्रातील प्रसिद्ध गायिका हा प्रवास उलगडून सांगितला. या कार्यक्रमात त्यांनी अभंग, गौळण, लावणी, गझल, चित्रपट गीते सादर केली. घागर घेऊन, रेशमाच्या रेघांनी, धुंदीत गंधीत होऊन सजना, हे सुरांनो चंद्र व्हा, जगी जीवनाचे सार, दिसते मला सुखचित्र नवे, लिंगोबाचा डोंगूर आभाळी गेला, सुख म्हणजे नक्की काय असतं, कांदा मुळा भाजी, अशी गीते सादर केली.

# बहुआयामी नेतृत्वाचा आदर्श : सिद्धार्थ भोकरे

शाईचा प्रवास | प्रतिक गंगणे

(दै. आरंभ पर्व)

महाराष्ट्राच्या सामाजिक, शैक्षणिक आणि माध्यम क्षेत्रात समतोल, मूल्याधिष्ठित आणि परिणामकारक कामगिरीचे नाव म्हणून सिद्धार्थ भोकरे ओळखले जातात. उद्योग, शिक्षण, पत्रकारिता आणि समाजसेवा या सर्व क्षेत्रांत त्यांनी निर्माण केलेली विश्वासार्हता ही केवळ पदांवर आधारित नसून सातत्यपूर्ण कष्ट, दूरदृष्टी आणि लोकांशी जोडणाऱ्या संवेदनशीलतेतून घडलेली आहे.



संजय भोकरे ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स (SBGI), मिरज या संस्थेच्या कार्यकारी संचालकपदावरून सिद्धार्थ भोकरे यांनी गुणवत्ताधारित शिक्षण, आधुनिक कौशल्ये आणि विद्यार्थीकेंद्रित धोरणांचा आग्रह धरला. त्याचवेळी 'दैनिक महानगरी' आणि 'दैनिक जनप्रवास' सारख्या प्रतिष्ठित दैनिकांच्या माध्यमातून त्यांनी लोकशाही मूल्ये, जबाबदार पत्रकारिता आणि समाजहिताची भूमिका ठामपणे मांडली. शिक्षणातून सक्षम नागरिक घडवणे आणि माध्यमांतून सजग समाज निर्माण करणे या दोन्ही ध्येयांचा त्यांनी प्रभावी समन्वय साधला. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघात डिजिटल मीडिया प्रमुख म्हणून त्यांनी नव्या माध्यमांच्या संधी ओळखून पत्रकारांना तंत्रस्नेही, नैतिक आणि तथ्याधारित कामासाठी सक्षम केले. वेगाने बदलणाऱ्या डिजिटल युगात विश्वासार्हता टिकवणे हे आव्हान त्यांनी प्रशिक्षण, मार्गदर्शन आणि स्पष्ट धोरणांनी पेलले.

मिरज–सांगली परिसरातील अंबाबाई तालीम संस्थेचे अध्यक्ष म्हणून क्रीडा-संस्कृतीला त्यांनी प्रोत्साहन दिले. सामाजिक उपक्रमांतून तरुणाईला दिशा देणे, स्थानिक प्रश्नांना व्यासपीठ मिळवून देणे आणि सहकार्याची संस्कृती रुजवणे या बाबी त्यांच्या कार्यशैलीत ठळकपणे दिसतात.

राजकारण, प्रशासन, कला, क्रीडा आणि माध्यमे विविध क्षेत्रांतील मान्यवरांशी त्यांनी जपलेली मैत्री ही केवळ ओळखीपुरती मर्यादित नाही; ती परस्पर सन्मान, कामातील पारदर्शकता आणि समाजासाठी काहीतरी सकारात्मक घडवण्याच्या समान ध्येयातून उभी राहिलेली आहे. हीच व्यापक दृष्टी त्यांना प्रभावी जनसंपर्क आणि परिणामकारक नेतृत्वाकडे घेऊन जाते. सिद्धार्थ भोकरे यांचा प्रवास सांगतो की, नेतृत्व म्हणजे केवळ अधिकार नव्हे ते जबाबदारी, संवेदना आणि सातत्याचे फलित आहे. शिक्षण, माध्यमे आणि समाजसेवा या तिन्ही स्तंभांना जोडून त्यांनी निर्माण केलेला प्रभाव अनेकांसाठी प्रेरणादायी आहे. मूल्यांवर ठाम राहून बदल घडवण्याची त्यांची भूमिका आजच्या तरुण पिढीसाठी दिशादर्शक ठरते.

### दै. आरंभ पर्वचे आरंभरत्न



**पत्रकारिता ही केवळ बातम्या देण्याची प्रक्रिया नसून समाजाला दिशा देण्याचे, प्रश्नांना आवाज देण्याचे आणि परिवर्तनाची चळवळ उभारण्याचे माध्यम आहे. या मूल्यांची जाणीव कृतीत उतरवणारे नेतृत्व म्हणून सिद्धार्थदादा संजयजी भोकरे यांना दै. आरंभ पर्वच्या तिसऱ्या वर्धापनदिनानिमित्त ९ सप्टेंबर २०२५ रोजी 'राज्यस्तरीय नवचेतना पुरस्कार २०२५' सोहळ्यात 'आरंभरत्न पुरस्कार' प्रदान करण्यात आला आहे.**



## झायडस पिंकॅथॉनचे सात वर्षांनंतर पुण्यात शानदार पुनरागमन

पुणे (दै. आरंभ पर्व)

- शहरातील महिलांच्या धावण्याच्या चळवळीला पुन्हा नवी ऊर्जा

सात वर्षांच्या खंडानंतर, झायडस पिंकॅथॉन पुण्यात परत येत आहे, जे भारतातील महिलांच्या सर्वात मोठ्या धावण्याच्या मंचांपैकी एक असलेल्या या स्पर्धेसाठी एक महत्त्वपूर्ण पुनरागमन आहे. शहरात शेवटची स्पर्धा २०१९ मध्ये आयोजित करण्यात आली होती. पुणे पर्वाचे अधिकृत अनावरण मंगळवारी हयात रीजन्सी पुणे अँड रेसिडेन्सेस येथे आयोजित पत्रकार परिषदेत करण्यात आले. या परिषदेला पिंकॅथॉनचे संस्थापक, अभिनेते आणि एंड्युरन्स आयकॉन मिलिंद सोमण, इन्व्हिन्सिबल वुमनच्या संस्थापिका अंकिता कोनवर आणि झायडस लाइफसायन्सेसचे अग्रगण्य कर्करोगतज्ञ डॉ. तुषार पाटील उपस्थित होते. या घोषणेने महिलांची फिटनेस, प्रतिबंधात्मक आरोग्य आणि सहभागावर आधारित धावण्यावर लक्ष केंद्रित करणाऱ्या झायडस पिंकॅथॉनच्या २०२५-२६ च्या देशव्यापी हंगामाची सुरुवात झाली आहे. पुणे येथील ही शर्यत ५ एप्रिल, २०२६ रोजी एएफएमसी ग्राउंड येथे होणार आहे. या हंगामातील मुंबई आणि बंगळूरु येथील यशस्वी आवृत्त्यांनंतर हयात रीजन्सी पुणे अँड रेसिडेन्सेस येथे ही घोषणा करण्यात आली. मुंबई व बंगळुरू आवृत्त्याना मोठ्या प्रमाणावर सहभाग मिळाला आणि ज्यामुळे प्रमुख शहरांमध्ये झायडस पिंकॅथॉनचा वाढता प्रभाव अधोरेखित झाला.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.